# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २५/०१/२०२५ (शनिवार) दुपार**

---

## जबरी चोरीच्या गुन्हयातील आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात

फिर्यादी नामे– नरेश केशवराव भांडे वय ५२ वर्ष रा वार्ड क्र ३ शिक्षक कॉलनी पाटनसावंगी हा एचपी गॅस एजेन्सी कोलमाईन्स पाटनसावंगी येथे एजेन्सीची गाडी क्र एम एच ४० ६३०६ ही चालवितो. दिनांक २४/०१/२०२५ रोजी फिर्यादी हा आपली गाडी घेवुन पौनीकर गल्लीमध्ये निबांच्या झाडाखाली उभी करुन सिलेंडर वाटप करत होता त्याचे जवळ सिलेंडरचे २९७१५/–रू. जवळ होते फिर्यादी हा गाडीमध्ये बसला असता ४ अनोळखी ईसमांनी त्याचेजवळ येवुन पैशाची मागणी केली फिर्यादीने माझ्याकडे पैसे नाही असे म्हटले असता त्यांनी फिर्यादीचे गाडीचे गेट उघडुन कॉलर पकडुन गाडी खाली ओढले व खिशातुन २९,७००/ रु जबरीने हीसकावुन नेले अशा फिर्यादीचे रिपोर्टवरुन पोस्टे खापरखेडा येथे अप क्र. ४१/२५ कलम ३०९ (४) भा. न्या. सं. अन्वये गुन्हा नोंद केला होता.

सदर गुन्हयाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा करीत असताना दि. २४/०१/२०२५ रोजी हे पोलीस ठाणे खापरखेडा अप. क्र. ४१/२५ कलम ३०९ (४) भा. न्या. सं. गुन्हयात आरोपी शोध करीत फिरत असता मुखबिर कडून माहिती मिळाली की सदरचा गुन्हा मनीष सुर्यवंशी व त्याच्या साथीदारांनी मिळुन केला आहे व ते शिव नगर चनकापूरचा ग्राऊंड लपून बसले आहे अशा खबरे वरून **आरोपी १)मनीष शिवनदन सुर्यवंशी वय २२ वर्ष रा वार्ड न ६ चनकापूर २) सूरज दिनेश उईके वय १९ वर्ष रा जय भोले नगर चनकापूर ३) अनिकेत पदमाकर कोवे वय २५ वर्ष रा वॉर्ड न ४ खापरखेडा ४) विसबा पवन उर्फ शेषराव इवनाते वय १७ वर्ष रा मिलन चौक चनकापूर** यांना चनकापूर ग्राउंड आणि चेक पोस्ट येथून ताब्यात घेऊन गुन्हयाबाबत सखोल विचारपूस केली असता गुन्हा केल्याची कबुली दिल्याने आरोपी इसमांकडून १) नगदी २३१००/– रु २) १ कीपॅड मोबाईल किंमती १०००/–रू. ३) गुन्हयात वापरलेली हिरो कंपनीचे स्प्लेंडर मोटर सायकल किंमती ५०,०००/–रू. अशा एकूण ७४,१००/– रु चा माल जप्त करण्यात आला. सदर आरोपी यांची मेडिकल तपासणी करून पुढील तपासकामी पो स्टे खापरखेडा यांचे ताब्यात देण्यात आले.



## सावनेर येथील सराईत गुन्हेगार अमोल उर्फ गोलु दामोधर कमाले याला MPDA कायदयांतर्गत १ वर्षाकरीता केले स्थानबद्ध

स्थानबद्ध ईसम नामे अमोल उर्फ गोलु दामोधर कमाले, ३६ वर्ष, रा.वार्ड क्र. १७ झेंडा चौक पहलेपार सावनेर, पो.ठा.सावनेर, तह—सावनेर, जिल्हा नागपुर ग्रामीण (ग्रामीण) यांचेविरूद्ध पोलीस ठाणे साववनेर येथे मालमत्ता चोरी, जबरी चोरी आणि शारीरीक गंभीर दुखापती सारखे गुन्हे नोंद असुन सराईत गुन्हेगार प्रवृत्तीचा आहे. मागील ६ महीण्यापुर्वी सदरचे स्थानबद्ध ईसमांविरूद्ध कलम ५६ मपोका अन्वये प्रतीबंधक कार्यवाही चा प्रस्ताव उपविभागिय दंडाधिकारी सावनेर यांचे कडुन मंजुर करून तडीपार करण्यात आलेले होते. तरी सुद्धा त्याचेमध्ये सुधारणा झालेली नाही, पुन्हा त्याने दरोडा सारखा गुन्हा केलेला आहे.

सदर स्थानबद्ध ईसम यांची गुन्हेगारी पाहता, वस्तीत, गावात तसेच शहरात त्याची दहशत निर्माण होवुन भितीने वातारण तयार झालेले होते.त्यामुळे सदर स्थानबद्ध ईसमांविरूद्ध MPDA (Maharashtra Prevention of Dangerous Activities Act) चा प्रस्ताव तयार करून जिल्हादंडाधिकारी, नागपुर यांना प्रस्ताव सादर केला असता, सदर प्रस्तावाचे अनुषंगाने जिल्हादंडाधिकारी, नागपुर यांचे कार्यालयीन आदेश क्र. आजिदं/गृह/कक्ष १४(१)/कावि—१८/२०२५ दिनांक २४/०१/२०२५ अन्वये समाज विघातक अपराधीक गतीविधीतुन सार्वजनिक सुव्यस्थेच्या दृष्टीकोनातुन कोणत्याही प्रकारचे नुकसानदायक कृत्यापासुन परावृत्त करण्यासाठी महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधीद्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, व्हिडीओ पायरेट्स, वाळु तस्कर, आणि अत्यावश्यक वस्तंचा काळाबाजार करणा—या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालने सबंधी अधिनियम सन १९८१ (महा. एल.व्ही.१९८१) चे कलम ३ अन्वये **एक वर्षाकरीता स्थानबध्दतेचा आदेश झालेला आहे**.सदर चे आदेशाचे प्रामणे २४/०१/२०२५ रोजी स्थानबध्द इसमास मध्यवर्ती करागृह नागपुर येथे दाखल करण्यात आले आहे.



स्थानबद्ध ईसम अमोल उर्फ गोलु दामोधर कमाले

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर